आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१६ नोव्हेंबर २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- समाजातल्या प्रत्येक घटकाच्या सक्षमीकरणासाठी महायुती सरकारनं काम केल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांंचं प्रतिपादन

- महाविकास आघाडीचं सरकार आल्यावर सोयाबीन, कांदा पिकाला योग्य हमीभाव देण्याचं काँग्रेस नेते राहुल गांधी यांचं प्रचारसभेत आश्वासन

- विधानसभा निवडणुकीनंतर वंचित बहुजन आघाडी सत्तेत जाण्याचा प्रयत्न करेल, असं प्रकाश आंबेडकर यांचं वक्तव्य

**आणि**

- उत्तर प्रदेशातल्या झाशी इथं वैद्यकीय रुग्णालयात लागलेल्या आगीत १० बालकांचा मृत्यू, राष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांकडून सहवेदना व्यक्त

**<><><><><>**

समाजातल्या प्रत्येक घटकाच्या सक्षमीकरणासाठी राज्यातल्या महायुती सरकारनं गेल्या अडीच वर्षात प्रयत्न केले असून जनता सरकारच्या कामाबद्दल पूर्ण समाधानी असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितलं. त्यांनी आज नमो ॲपच्या माध्यमातून राज्यातल्या भाजपाच्या बूथ कार्यकर्त्यांशी संवाद साधला. 'मेरा बूथ सबसे मजबूत' ही या संवादामागची संकल्पना होती. मतदारांना भाजपाच्या संकल्पाची माहिती समजावून सांगून भाजपाला मतदान करण्याचं आवाहन प्रेमानं करावं, असं मोदी यांनी मार्गदर्शन करताना सांगितलं. महाराष्ट्रातल्या जनतेचं प्रेम आपण अनुभवलं असून महायुतीचं सरकार पुन्हा एकदा सत्तेत येईल, असा विश्वास

त्यांनी व्यक्त केला. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यामुळे भाजपासाठी अनुकूल वातावरण असल्याचं ते म्हणाले. भाजपा सुरुवातीपासून मध्यमवर्गाच्या आकांक्षांवर लक्ष केंद्रीत करत असून देशाच्या अर्थव्यवस्थेत मध्यमवर्गाचं योगदान सगळ्यात जास्त आहे, हे लक्षात घेऊन त्यांच्यावरचा कराचा बोजा कमी केल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><>**

राज्यात महाविकास आघाडीचं सरकार आल्यास सोयाबीनला सात हजार रुपये हमीभाव तसंच कांद्याला विशेष समिती नेमून योग्य भाव देण्यासाठी आपण कटिबद्ध राहू असं आश्वासन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दिलं आहे. ते आज अमरावती जिल्ह्यात धामणगाव रेल्वे इथं प्रचारसभेत बोलत होते. देशाच्या विकासात काँग्रेसनं अमूल्य योगदान दिलं असून काँग्रेस नेहमीच शेवटच्या घटकाचा सर्वात आधी विचार करते असं ते म्हणाले.

शेतकऱ्यांचं ७० हजार कोटी रुपयांचं कर्ज आम्ही माफ केलं होतं परंतु भाजपा सरकारने २५ अब्जाधीशांचं १६ लाख कोटींचं कर्ज माफ केल्याचा आरोप त्यांनी केला. शेतकरी, मजूर, महिला यांना हे पैसे मिळतील असे प्रयत्न आम्ही करणार असून ते कधीही अब्जाधीशांच्या घशात जाऊ देणार नाही असं त्यांनी सांगितलं. प्रधानमंत्र्यांनी अब्जाधीशांसाठी नव्हे तर देशातील गरिबांसाठी काम करायला हवं असं ते म्हणाले.

**<><><><>**

मोदी सरकारनं शेतकऱ्यांवर चहूबाजूंनी हल्ला चढवला असल्याचा आरोप काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी केला आहे. त्या आज शिर्डी इथं प्रचारसभेत

बोलत होत्या. भाजप सरकारातल्या नेत्यांनी प्रत्येक क्षेत्रात भ्रष्टाचार केला असून जनतेच्या पैशातून अनेक गैरव्यवहार होत असल्याचं त्या म्हणाल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी निरनिराळ्या मार्गांनीं दहशत निर्माण करत असून नागरिकांनी निडरपणे मतदान करावं असं आवाहन प्रियांका गांधी यावेळी केलं.

**<><><><><>**

वंचित बहुजन आघाडी सत्तेत जायचा प्रयत्न करेल, असं वक्तव्य पक्षाचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आज वार्ताहरांशी बोलताना केलं. आता तत्वांचं राजकारण संपलं असून संधीसाधू राजकारण सुरू झालं आहे, असं आंबेडकर म्हणाले. महाराष्ट्रात शेतमालाचे भाव पडले आहेत त्यावर आज कुणीही बोलत नाही, तर धर्माच्या नावाने मतं मागितली जात आहेत. जातीजातीत फूट पाडली जात आहे, असंही आंबेडकर म्हणाले.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीत कोकणात एकही जागा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाला मिळणार नाही तसंच राज्यात १७० जागा महायुतीला मिळतील, असा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज रत्नागिरी जिल्ह्यातल्या दापोलीत केला. दापोली मतदारसंघातले शिवसेनेचे उमेदवार योगेश रामदास कदम यांच्या प्रचारसभेत ते बोलत होते.

**<><><><><>**

भाजपा नेत्यांकडून धर्माचा वापर करून समाजात फूट पाडण्याचे प्रयत्न केले जात आहेत, अशी टीका ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज पुण्यात वार्ताहरांशी बोलताना केली. देवेंद्र फडनवीस यांनी या निवडणुकीला धार्मिक रंग देण्याचा प्रयत्न

केला, निवडणुकीत यश मिळणार नाही, याची खात्री झाल्यामुळेच भाजपा नेते असं करत आहेत, असं पवार म्हणाले.

**<><><><><>**

उद्योग, सेवा, कृषी क्षेत्रात पूर्वी आघाडीवर असलेल्या महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची सद्यस्थिती चिंताजनक असल्याचं काँग्रेस नेते आणि माजी अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबई प्रदेश काँग्रेसच्या वार्ताहर परिषदेत बोलत होते.

**<><><><><>**

नवी मुंबईत बेलापूर विधानसभा मतदारसंघात आजपासून गृह मतदानाला सुरूवात झाली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी अश्विनी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नोडल अधिकारी महेश मेश्राम आणि अजित न्यायनिर्गुणे यांच्यासह त्यांचं पथक गृहमतदान घेत आहे.

**लातूर** जिल्ह्यात सर्व ६ मतदारसंघात पहिल्या टप्प्यातलं गृह मतदान पूर्ण झालं आहे. जिल्ह्यात ११ नोव्हेंबरपासून गृह मतदान सुरू झालं. यामध्ये दिव्यांग मतदारांसह वयाची शंभरी ओलांडलेल्या मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

लातूर शहर विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षांवरील आणि दिव्यांग अशा एकूण ३६८ मतदारांपैकी ३४९ जणांचं मतदान आज झालं. उदगीर आणि निलंगा विधानसभा मतदारसंघात १४ नोव्हेंबर रोजी पहिल्या टप्प्यातलं गृह मतदान झालं.

**अहमदपूर,** लातूर शहर आणि औसा मतदारसंघातील गृह मतदानाचा पहिला टप्पा १५ नोव्हेंबर रोजी पार पडला.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज कोल्हापूर जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबरला सर्वांनी मतदान करावं असं आवाहन अभिनेत्री शिवाली परब यांनी केलं आहे......

**होल्ड बाईट.... (१७ सेकंद)**

**<><><><><>**

उत्तर प्रदेशातल्या झाशी शहरातल्या महाराणी लक्ष्मीबाई वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात, काल रात्री लागलेल्या आगीत, अतिदक्षता विभागातल्या १० बालकांचा जळून मृत्यू झाला तर १६ बालकं जखमी झाली आहेत. अद्याप ३ मृतदेहांची ओळख पटली नसून त्यासाठी डीएनए चाचणीची मदत घेतली जाणार आहे. ही दुर्घटना घडली तेव्हा अति दक्षता विभागात ४७ बालकं होती. उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री बृजेश पाठक यांनी घटनास्थळी भेट देऊन या घटनेची त्रिस्तरीय चौकशी करण्याच्या सूचना दिल्या.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह यांनी नवजात बालकांच्या मृत्यूबाबत शोक व्यक्त केला आहे. प्रधानमंत्र्यांनी या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या प्रत्येक बालकाच्या कुटुंबियांना प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत

निधीतून २ लाख रुपये, तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**<><><><>**

येत्या पाच वर्षात मुंबईकरांसाठी प्रवासाचा अनुभव सुखद होईल, असं आश्वासन रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत दिलं. राज्यात रेल्वेच्या माध्यमातून १ लाख ६४ हजार ६०५ कोटी रुपयांची आणि मेट्रो मध्ये १ लाख १० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होत आहे. ६ हजार किलोमीटर लांबीचे नवे मार्ग राज्यात उभारले जात आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

**<><><><>**

राज्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीदरम्यान मध्य रेल्वे विभाग मुंबईत विशेष उपनगरीय रेल्वे गाड्या चालवणार आहे. या विशेष उपनगरीय गाड्या १९ ते २१ नोव्हेंबर या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस पासून **मध्य रेल्वे मार्गावरच्या** कल्याण आणि हार्बर मार्गावरच्या पनवेल स्थानकापर्यंत धावणार आहेत. मतदानाच्या दिवशी दिव्यांग मतदारांसाठी मोफत बस प्रवासाची सुविधा देखील उपलब्ध करून दिली जाणार आहे.

**<><><><>**

सांगली विधानसभा मतदारसंघात बंडखोरी करून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्या जयश्री पाटील यांना काँग्रेसनं पुढच्या सहा वर्षांसाठी पक्षातून निलंबित केलं आहे. काँग्रेसचा अधिकृत उमेदवार या मतदारसंघातून निवडणूक लढवत असतानाही जयश्री पाटील यांनी अपक्ष म्हणून उभं राहणं हे पक्षशिस्तीचा भंग असल्यानं ही कारवाई करत असल्याचं पक्षाच्या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

राहुल गांधी विरोधी पक्ष नेता झाल्यानंतर संसदेत चर्चेचा आणि संवादाचा स्तर खाली गेल्याचा आरोप केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री आणि भाजपचे नेते किरण रिजिजू यांनी केला. ते आज नागपूरात भाजपा कार्यालयात वार्ताहर परिषदेत बोलत होते. या हिवाळी अधिवेशनात वक्फ सुधारणा विधेयक पारित करून गरीब मुसलमानांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देऊ असं त्यांनी सांगितलं.

**//<><><><><>//**